ePaper
पवारांचा गड, आता काँग्रेसचा डोळा! पृथ्वीराजबाबा माढा मतदारसंघासाठी आक्रमक



वर्ष - 7 । अंक - 105 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- अभावग्रस्तांच्या प्रभावाचा संघर्ष संपेना!
- पुणे मेट्रोला वीजपुरवठा नाही
- पाच राज्यांतील निवडणुकीची रणनीती
- भारतीय संघ आयर्लंडला रवाना

www.mahaenews.com । गुरुवार, दिनांक 16 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतिक!

## »चऱ्होलीकरांचा आदर्श : मस्जिदच्या प्रांगणात प्रभातफेरी

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अहेले सुन्नत्वल जमात मुलाणी मस्जिदच्या प्रांगणात 76 वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने श्री वाघेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावामध्ये प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. मुलाणी मस्जिदच्या प्रांगणात प्रभातफेरी मध्ये सहभागी विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षकवृंदाचे व समस्त ग्रामस्थांचे शब्द सुमनांनी स्वागत करण्यात आले.**



श्री वाघेश्वर विद्यालयाच्या स्काउट टीम व बॅन्ड पथकांनी ध्वजाला सलामी दिली. त्यानंतर निवृत्त पोलिस अधिकारी तात्या साहेब तापकीर (पाटिल) यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी माजी महापौर नितीन काळजे, माजी नगरसेविका सुवर्णा बुर्डे, प्राचार्य धावडे सर, मुस्लिम समाजाचे अध्यक्ष सिराज मुलाणी, ह.भ.प.भानुदास महाराज तापकीर, ह.भ.प.अशोक महाराज ढोरजे, उल्हासराव काटे, गुलाबराव ताजणे, प्रा.बी.एन चव्हाण व इतर समस्थ ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महमंदशरीफ मुलाणी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सिराज मुलाणी, वसिम मुलाणी, शहीद मुलाणी, इमाम मुलाणी, जमिर मुलाणी, अकबर मुलाणी, रफीक इनामदार, मुबारक पठाण, अय्युब शेख, उस्मान तांबोळी, पठाण सर यांनी विशेष प्रयत्न केले.

### तिरंगा रॅलीला प्रतिसाद...

» स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने पिंपळे सौदागर मधील उन्नति सोशल फाउंडेशन यांच्या संयोजनातून आणि इंडो अॅथलेटिक्स असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या 'तिरंगा सायकल रॅली'ला शहरातील सायकलपटूंचा उदंड प्रतिसाद मिळाला. या रॅलीत सुमारे १७०० सायकलपटूंनी सहभाग घेतला होता. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. या रॅलीला उदंड प्रतिसाद लाभल्याचे चित्र पहावयास मिळाले. आठ वर्षांच्या बालकांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत आबालवृद्ध या तिरंगा सायकल रॅलीत मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. या रॅलीच्या माध्यमातून देशभक्तीचा जागर करण्यात आला. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

# कर्तव्यदक्ष अग्निशमन आठ जवानांचा सन्मान!

## »आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून कौतुक : स्वातंत्र्य दिनी जवानांचा केला गौरव

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने अग्निशमन विभागातील आठ जणांचा विविध पदके देऊन सन्मान करण्यात आला. स्वातंत्र्य दिनानिमित्त मंगळवारी (दि.15) हा सन्मान पालिका आयुक्तांच्या हस्ते करण्यात आला. सेवानिवृत्त लीडिंग फायरमन तानाजी चिंचवडे यांना 'सुरक्षित सेवापूर्ती पदक' देण्यात आले.**




चिंचवडे 7 एप्रिल 1988 रोजी महापालिकेच्या अग्निशमन विभागात फायरमन म्हणून रुजू झाले होते. 30 जून 2023 रोजी ते 35 वर्षांच्या सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांनी आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडले त्याबद्दल त्यांना सुरक्षित सेवापूर्ती पदक देण्यात आले. सेवानिवृत्त लीडिंग फायरमन अशोक इंगवले यांना 'सुरक्षित सेवापूर्ती पदक' देण्यात आले. इंगवले 12 फेब्रुवारी 1988 रोजी फायरमन म्हणून रुजू झाले. 35 वर्षाच्या सेवेनंतर ते 30 जून 2023 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांनी आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडले त्याबद्दल त्यांना सुरक्षित सेवापूर्ती पदक देण्यात आले. लीडिंग फायरमन सुभाष लांडे यांनाही 'सुरक्षित सेवापूर्ती पदक' देण्यात आले. लांडे 16 जून 1990 रोजी फायरमन म्हणून रुजू झाले. 33 वर्षांच्या सेवेनंतर ते 31 मे 2023 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांनी आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडले त्याबद्दल त्यांना सुरक्षित सेवापूर्ती पदक देण्यात आले.

### अग्निशमन सेवा पदक...

» सिनियर फायरमन सोमनाथ तुकदेव यांना 'अग्निशमन सेवा पदक' देण्यात आले. 20 मे 2023 रोजी दुगदिवी टेकडीवरील आग वर्दी पूर्ण करून प्राधिकरण उप केंद्रात परत येत असताना अग्निशमन वाहनाच्या इलेक्ट्रिकल वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने अग्निशमन वाहनाच्या केबिन मध्ये आग लागली. या विपरीत परिस्थितीत तुकदेव यांनी समयसूचकता दाखवून वाहनातील बॅटरी विद्युत पुरवठा खंडित केला. वाहनात असलेले तीन फायर एस्टिंग्युशर वापरून आग विझवली. याच वर्दीवर असलेले वाहन चालक लक्ष्मण बंडगर यांनी अग्निशमन वाहनाला आग लागताच परिसरातून बकेटच्या सहाय्याने पाणी मारून आगीवर नियंत्रण मिळवले. यामुळे मोठे नुकसान टळले. याबद्दल लक्ष्मण बंडगर यांचा 'अग्निशमन सेवा पदक' देऊन सन्मान करण्यात आला.

# पुणे मेट्रोला वीजपुरवठा नाही

## अंतर्गत यंत्रणेतील बिघाडामुळे मेट्रोची सेवा ठप्प

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नव्यानेच सुरू झालेल्या पुणे मेट्रोचा वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे सोमवारी (दि. 14) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास वनाझ ते रूबी हॉल मार्गावरील सेवा 20 मिनिटे बंद पडली होती. यासाठी महावितरण कोणत्याही प्रकारे जबाबदार नाही तसेच पुणे मेट्रोच्या वीजपुरवठ्याशी कोणताही संबंध नाही असे महावितरणकडून बुधवारी स्पष्ट करण्यात आले आहे.**



वस्तुस्थिती अशी आहे की, पुणे महामेट्रोला महावितरणकडून नव्हे, तर महापारेषण कडून 132 केव्ही दाबाचा वीजपुरवठा केला जातो. महापारेषणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी सायंकाळी पुणे मेट्रोकडून रेंजहिल्स अतिउच्चदाब 132 केव्ही उपकेंद्रात वीजयंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीचे काम सुरू होते.

त्यावेळी अंतर्गत वीज यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाल्यामुळे मेट्रो सेवेचा वीजपुरवठा 20 मिनिटे बंद होता. मात्र या प्रकाराशी महावितरण व महापारेषण कंपनीचा कोणताही संबंध नाही. तर मेट्रोच्या अंतर्गत वीज यंत्रणेतील बिघाडामुळे मेट्रो सेवा 20 मिनिटे ठप्प झाली होती.

### पुणे मेट्रोच्या वेळेत बदल

» नुकत्याच झालेल्या निर्णयानुसार पुणे मेट्रोच्या वेळेतील बदल हा दोन्ही मर्गासाठी लागू करण्यात आला आहे. आता पुणे मेट्रोची प्रवासी सेवा वनाझ ते रुबी हॉल क्लिनिक आणि पिंपरी चिंचवड महापालिका ते सिव्हिल कोर्ट या दोन्ही मार्गांवर सकाळी 6 ते रात्री 10 अशी सुरू राहील. हा बदल दिनांक 17 ऑगस्ट 2023 पासून लागू करण्यात येणार आहे. दिनांक 17 ऑगस्ट 2023 पासून वनाझ स्थानक ते रुबी हॉल क्लिनिक मार्ग व पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानक ते सिव्हिल कोर्ट स्थानक मार्ग यांच्यावर पुणे मेट्रोची वारंवारता

### पुढीलप्रमाणे असेल

- सकाळी 6 ते 8 - दर 15 मिनिटांनी
- सकाळी 8 ते 11 - दर 10 मिनिटांनी
- सकाळी 11 ते दुपारी 4 - दर 15 मिनिटांनी
- दुपारी 4 ते रात्री 8 - दर 10 मिनिटांनी
- रात्री 8 ते 10 - दर 15 मिनिटांनी

# चांगले कर्म हाच जीवनाचा मूलमंत्र!

## डी.एस.के. कुंजबन सोसायटीमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी क्रांतिकारकांनी बलिदान दिले. इंग्रजांच्या राजवटीतून आपली मुक्तता झाली. आपण आता स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत. मग, आपली राष्ट्रप्रति, मातृभूमीप्रति कर्तव्ये जपली पाहिजेत. सामाजिक भान ठेवले पाहिजे. नैतिक कर्तव्यांची जाणीव असावी आणि 'चांगले कर्म' हाच जीवनाचा मूलमंत्र आहे, असे मत नौदलाचे निवृत्त अधिकारी लेफ्टनंट उपेंद्र खंबाटे यांनी व्यक्त केले.**

पुनावळे- काटेवस्ती येथील डी.एस. के. हाउसिंग सोसायटीत भारताचा ७६ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लेफ्टनंट खंबाटे बोलत होते. यावेळी सोसायटीचे चेअरमन योगेश सूर्यवंशी, खजिनदार युवराज पाटील, कमिटी सदस्य अभिजित वाळवेकर, संजय पाटील, संदीप पाटील, विजय कांबळे, अमेय लाटकर, अधिकराव दिवे आदी उपस्थित होते. लेफ्टनंट खंबाटे यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सुरक्षा विभागाकडून राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. राष्ट्रीगीत व महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करुन कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. सोसायटीचे मुख्य व्यवस्थापक श्रीधर पन्हाळकर आणि व्यवस्थापक मेहताब मोमीन आणि सहकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात पुढाकार घेतला. रांगोळी, तिरंगा पताका, सजावट आणि राष्ट्रभक्तीची गीते यामुळे सोसायटीचे वातावरण मंगलमय झाले होते. सोसायटीतील रहिवाशांनी ध्वजारोहण आणि सांस्कृतिक कार्यक्रमासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विशेष पुढाकार घेतल्याबद्दल प्रियंका दिवे-पाटील, नेहा वाळवेकर, प्रज्ञा पाटील, कविता पाटील, आकांक्षा देसाई, भाग्यश्री सूर्यवंशी, कस्तुरी केदारी, दिप्ती पाटील यांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज पाटील यांनी केले.



### सांस्कृतिक कार्यक्रमात देशभक्तीचा जागर...

» स्वांतत्र्यदिनी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सोसायटीतील मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. समरजीत पाटील, आरव वावगे, आर्या कसुरकर, पृथ्वी पाठक, रोहिणी कुलकर्णी, मुद्रा कुष्टे, अथर्व वैद्य, अनिका नाईक, अद्वैत पाटील, आराध्या दिवे-पाटील, ऋणी वाळवेकर, स्वरांजली पाटील, विहान सूर्यवंशी, अबीर खंडेलवाल, किंजल केदारी, अन्वी वाळवेकर, मृन्मयी देसाई, संयोगिता पाटील, वंशिका पवार, वैभवी सूर्यवंशी, गार्गी पाटील, गिरीशा गायकवाड, यशिता, अहना, ज्युई जोगळेकर, प्रत्युष, क्रिशू आदींनी आपआपल्या गटात उत्तम सादरीकरण केले. तसेच, ज्येष्ठ नागरिक प्रदीप पवार यांनी देशभक्तीपर रोमहर्षक गीत सादर केले. उपस्थितीत रहिवाशांनी भारत माता की जय... वंदे मातरम्... अशा घोषणा देत मुलांचा उत्साह वाढवला.

### पुण्यातील म्हाडाच्या 5 हजार घरांची सोडत

। पुणे । महाईन्यूज ।

म्हाडाच्या पुणे मंडळाने पाच हजार घरांची सोडत काढण्याचा निर्णय घेतला असून या सोडतीची जाहिरात ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर तात्काळ अर्ज विक्री – स्वीकृतीच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात येणार आहे. तसेच ऑक्टोबरमध्ये या घरांसाठी सोडत काढण्यात येणार आहे. दरम्यान, या वर्षातील ही दुसरी सोडत आहे. म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या ४,०८२ घरांच्या सोडतीचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लवकरच कोकण, पुणे आणि औरंगाबाद मंडळांतील घरांसाठी सोडत काढण्यात येईल असे जाहीर केले. त्यानुसार पुणे मंडळातील पाच हजार घरांसाठी ऑक्टोबरमध्ये सोडत काढण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मंडळाचे मुख्य अधिकारी अशोक पाटील यांनी दिली.

# नाना काटेंच्या वाढदिनी शुभेच्छांची 'गर्दी'!

## मान्यवरांची मांदियाळी : सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**माजी विरोधी पक्षनेते व युवा नेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांचा वाढदिवस देशाच्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी नाना काटे यांना शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या पिंपळे सौदागर येथील जनसंपर्क कार्यालयाबाहेर दिवसभर मोठी गर्दी केली होती.**



खासदार श्रीरंगआप्पा बारणे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अजितभाऊ गव्हाणे, कविता अल्हाट, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, प्रशांत शितोळे, मयूर कलाटे, शाम लांडे, अतुल शितोळे, राजेंद्र जगताप, पंकज भालेकर, निलेश डोके, राहुल भोसले, विक्रांत लांडे, संतोष कोकणे, विनोद नढे, संजय वाबळे, प्रभाकर वाघेरे, समीर मासुळकर, सुलक्षणा शीलवंत, माई काटे, माई काळे, प्रज्ञा खानोलकर, खंडूशेठ कोकणे, प्रसाद शेट्टी, राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे , हभप प्रमोद महाराज जगताप, हभप पुरुषोत्तम महाराज पाटील, हभप संग्राम महाराज भंडारे, हभप लक्ष्मण महाराज जगताप (आळंदी) यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व हजारो नागरिकांनी नाना काटे यांना शुभेच्छा दिल्या. नाना काटे यांच्या वाढदिवसानिमित्त गेली आठवडाभरापासून शहरात विशेषतः चिंचवड मतदार संघात आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, नेत्र तपासणी शिबीर, वृक्षारोपण व वृक्षवाटप, आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार, रुग्णवाहिका लोकार्पण, फळे वाटप, जेष्ठ नागरिकांसाठी कार्यक्रम यांसारखे विविध समाजउपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### आरोग्य शिबिरांवर भर...

यावर्षी प्रामुख्याने आरोग्य शिबीर आणि रक्तदान शिबिरावर भर देण्यात आला होता. सांगवीतील शिबिरात ५३३ जणांचे रक्तदान आणि ६३० जणांची आरोग्य तपासणी, रहाटणीतील शिबिरात ७६७ जणांचे रक्तदान तर १४६२ लोकांची आरोग्य तपासणी, वाल्हेकरवाडीतील शिबिरात १०८३ जणांचे रक्तदान व १४६२ नागरिकांची आरोग्य तपासणी तसेच काळेवाडीत ३१२ जणांचे रक्तदान असे एकूण सर्व शिबिरात २६९५ नागरिकांनी रक्तदान केले आणि ३२५६ जणांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. या महाआरोग्य शिबिरासाठी डॉ.डी. वाय.पाटील हॉस्पिटल, लोकमान्य हॉस्पिटल, संजीवनी ब्लड बॅंक, जनसेवा ब्लड बॅंक, रेड प्लस बॅंक, या संस्थेंचे डॉक्टर आणि त्यांची टीम यांनी मोलाचे सहकार्य केले.

> " वाढदिवसाच्या निमित्ताने तुम्ही दिलेल्या शुभेच्छा माझ्यासाठी अमूल्य आहेत. म्हणूनच तुमचं प्रेम, तुमचा आशीर्वाद, तुमचा विश्वास सदैव माझ्यावर असावा, यामुळे कार्यतत्पर राहण्यास मला ऊर्जा मिळते. आपल्या सदैव ऋणात मी असणार आहे.
>
> - नाना काटे, मा. विरोधी पक्षनेते

### उपमुख्यमंत्री अजित दादांचा फोन...

» महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अचानकपणे महत्वाच्या बैठकीसाठी मुंबई येथे जावे लागल्याने अत्यंत व्यस्त शेडोल असतानाही न विसरता दादांनी आवर्जून नाना काटे यांना फोन करून शुभेच्छा दिल्या. तसेच प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कॉंग्रेसचे मा.प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले, आमदार शशिकांत शिंदे, मंत्री अदितीताई तटकरे, युवा नेते पार्थ दादा पवार, आमदार सुनील शेळके, आमदार अण्णा बनसोडे, आमदार निलेश लंके, मा. आमदार विलास लांडे, मा. आमदार गौतम चाबुकस्वार, मा. आमदार रमेश अप्पा थोरात यांच्यासह राज्यातील आजी माजी आमदार व दिग्गज नेते मंडळीनी काटे यांना फोनवर शुभेच्छा दिल्या.

---

# 'प्युमेरिया ड्राईव्ह' मधील नागरिकांचे रक्तदान!

## लायन्स क्लब, डॉ. वैद्य, सह्याद्री हॉस्पिटलतर्फे आयोजन

**।पिंपरी ।महाईन्यूज ।**

**रावेत येथील 7 प्युमेरिया ड्राईव्ह सोसायटी मध्ये रक्तदान शिबिर आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. लायन्स क्लब ऑफ चिंचवड रॉयल, डॉ. वैद्य आणि सह्याद्री हॉस्पिटलच्या वतीने याचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये सोसायटीमधील नागरिकांनी रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतली घेतला.**




या वेळी 7 प्युमेरिया ड्राईव्ह सोसायटीचे सर्व पदाधिकारी, नागरिक, आयोजक लायन उपेंद्र व वंदना खांबेटे, लायन्स क्लबचे सर्व पदाधिकारी, अध्यक्ष मधुरा बुटाला, सचिव पूजादेवी निखळ, खजिनदार ओंकार पटवर्धन व झोनचे अध्यक्ष लायन प्रीतम दोशी उपस्थित होते. सह्याद्री हॉस्पीटलच्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी रक्तदान शिबीराला मदत केली. या वेळी एंडोर्फिन्सच्या सहकाऱ्यांनी नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी केली. लायन्स क्लबच्या वतीने दरवर्षी 15 ऑगस्ट, 26 जानेवारी आणि 2 ऑक्टोबरला शहरातील विविध सोसायट्यांमध्ये रक्तदान शिबीर तसेच आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले जाते. नागरिकांचे आरोग्य सदृढ रहावे तसेच रक्तदानातून इतरांना मदत व्हावी, या उद्देशाने याचे आयोजन केले जाते. वर्षातून 4 वेळा हे शिबिर आयोजित केले जाते. रक्त तपासणी, महिलांसाठी स्तनांचा कर्करोग तपासणी, आजारांची तपासणी होते.

### 1 हजारपेक्षा अधिक नागरिकांना लाभ

» लायन्स क्लब ऑफ चिंचवड रॉयल या सेवाभावी संस्थेमार्फत आयोतिज शिबिराचा आतापर्यंत 1 हजार पेक्षा अधिक नागरिकांनी लाभ घेतला आहे. या सेवेचा फायदा घेऊन वेळीच औषधोपचार करून घेतल्याने नागरिकांचा देखील फायदा झाला आहे. लहान मुलांची नेत्र तपासणी व गरजू मुलांच्या डोळ्यांचे अगदी माफक दरात अथवा अगदी मोफत उपचार करण्यासाठी हा क्लब ओळखला जातो.

# स्वाभिमानी सोलापूर फाऊंडेशनतर्फे ध्वजारोहण



**।पिंपरी ।प्रतिनिधी :**

स्वाभिमानी सोलापूर मराठवाडा फाऊंडेशन आणि दत्त साई प्रतिष्ठानतर्फे देशाचा 76 वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी या वेळी प्रमूख पाहुणे सुनिल काकळे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. या वेळी धनाजी खाडे, गुरूदास जगताप, अस्लम काझी प्रमुख उपस्थित होते. दत्तात्रय जगताप यांनी स्वाभिमानी सोलापूर मराठवाडा फाऊंडेशन, दत्त साई प्रतिष्ठानची स्थापना केली. त्या माध्यमातून त्यांनी शहरात विविध उपक्रम आयोजित केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षी संस्थेच्या वतीने देशाचा स्वातंत्र्यदिन विविध कार्यक्रमांतून उत्साहात साजरा केला जातो. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते ध्वजवंदन कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यंदा देखील ही परंपरा कायम ठेऊन देशाचा अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. या वेळी भिकाजी चौधरी, गणेश ठोंबरे, सुरेश सोलट, उपेंद्र रावत, बाळासाहेब निंबाळकर, प्रदीप तांबी, शिवाजी सादुले, गणपत शिंदे, संदीप जगदाळे, ऋषभ गोळे, बाळकृष्ण खरपस, मुकूंद नाईक, विश्वनाथ पवार, राजेंद्र गायकवाड, पिंगळे, बच्छाव, वनवे, भरारे, कलापुरे आदीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पर्यटनाचा आपत्तींशी संबंध आहे




**'चारधाम यात्रा' कोणत्याही महिन्यात करता यावी, यासाठी बांधलेला 'बारमाही महामार्ग' पुन्हा जागोजागी खचल्याची बातमी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आली आणि ही यात्रा बेमुदत स्थगित केल्याचे प्रशासनाने जाहीर केले. याच उत्तराखंड राज्यातील डेहराडूनमध्ये एका 'डिफेन्स अकॅडमी'ची इमारत कशी खचून कोसळली, हे महाराष्ट्रातही अनेकांनी समाजमाध्यमांवरून पाहिले असेल.**



हिमाचल प्रदेशाच्या राजधानीचे शिमला शहर आता संपर्क तुटल्यागत झाले आहे. शिमल्याकडे जाणाऱ्या छोट्या रेल्वेगाडीचे रूळच खचले आहेत. कालका आणि शिमल्याला जोडणाऱ्या पर्वतीय महामार्गावर हेच दृश्य दिसते. मनालीकडे जाणाऱ्या मार्गावरील महत्त्वाच्या फाट्यावरचे मंडी शहर जलमय झाले आहे... या बातम्यांकडे एरवी कदाचित भारतातील अन्य राज्यांचे कमी लक्ष गेले असते, पण आता प्रत्येक राज्यातून या दोन हिमालयीन राज्यांत पर्यटकांची वर्दळ वाढतच असते. या पर्यटकांसाठीच तर इथले रस्ते 'चारपदरी महामार्ग' म्हणून 'विकसित' केले जातात. त्यासाठी अभियांत्रिकीचा अक्षरशः अत्याचारच हिमालयासारख्या तुलनेने भुसभुशीत पर्वतरांगांवर होत राहातो. मग दर पावसाळ्यात- किंवा हिवाळ्यातील जलवृष्टीने- चकचकीत हायवेवर धारदार कापलेले उतार तुंबत राहतात. मजूर आणि त्यांचे कंत्राटदार मलबा साफ करण्यासाठी परततात. यंदाच्या मुसळधार पावसामुळे हे झालेच, पण हल्ली जवळपास प्रत्येक मोसमात हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील सर्व प्रमुख पर्यटन स्थळे अधूनमधून त्रास सहन करत आहेत. आणि पर्यटकांच्या दिमतीसाठी निसर्गाच्या गरजा विसरून जाणे, ही समस्या काही फक्त हिमाचल प्रदेश वा उत्तराखंडची नाही, ती जागतिक समस्या आहे, तरीसुद्धा पर्यटक-संख्या मर्यादित करण्याची चर्चा कधी होत नाही. उलट 'लोक पुन्हा प्रवास करत आहेत' ही अगदी आंतरराष्ट्रीय टीव्ही चॅनेलवर वारंवार ऐकली- पाहिली जाणारी आनंदवार्ता असते. विशेषतः करोना टाळेबंदीनंतर, मोठ्या संख्येने लोक सुट्टी घेऊ लागले आहेत. त्यांपैकी अनेक पर्यटकांना अशा 'नैसर्गिक'(?) आपत्तींचा सामना करावा लागत आहे — जंगलातील आग, अभूतपूर्व उच्च तापमान, पूर, भूस्खलन अशा एक ना दोन आपत्ती जगात कुठे ना कुठे आहेतच. ग्रीससारखा देश वर्षानुवर्षे युरोपीय उन्हाळी पर्यटनावर इतका अवलंबून राहू लागला आहे की असे अनेक देश, पर्यटकांना निराश करण्याची कल्पनाही करू शकत नाहीत. ग्रीससारखाच युरोपीय पर्यटकांना आकर्षित करणारा स्पेन आणि अमेरिका खंडातली हवाई बेटे येथील जंगलांमध्ये मोठ्या आगी लागल्या, गावे बेचिराख झाल्याच्या बातम्या आल्या... पण म्हणून पर्यटकांचा हिरमोड झालेला नाही. त्यांनी मौजमजेसाठी पैसे मोजले आहेत आणि हवामानाचा अंदाज काहीही असला तरीही पर्यटक चालले आहेत मजा करायला! या पार्श्वभूमीवर, ॲमस्टरडॅमहून आलेली बातमी नवलाची आहे. समुद्रपर्यटनाच्या 'क्रूझ' जहाजांना शहरालगतच्या समुद्रात थांबण्यावर बंदी घालण्याचा निर्णय ॲमस्टरडॅमच्या महापौरांनी घेतला आहे. त्या शहरात २०२१ मध्ये केलेल्या अभ्यासातून असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की एक मोठे क्रूझ जहाज एका दिवसात ३० हजार ट्रक जितके नायट्रोजन ऑक्साईड उत्सर्जित करतील, तितके प्रदूषण करते. प्रत्येक क्रूझ जहाज सात हजार पर्यटकांना आणते, यामुळे शहरात काम आणि व्यवसाय निर्माण होतो. तरीही हा कटू निर्णय ॲमस्टरडॅमने घेतला. पण म्हणून पर्यटन थांबते की काय? नाहीच- आणि पर्यटनाला प्रसारमाध्यमांतून दिली जाणारी प्रतिष्ठा तर वाढतच असते... व्हर्जिन गॅलेक्टिक नावाच्या कंपनीने आता अंतराळ-पर्यटनाचीही युक्ती लढवली आहे, त्या पर्यटनाची माहिती देणाऱ्या बातम्या टीव्हीवर पाच- पाच मिनिटे चालतात, पण ॲमस्टरडॅमच्या महापौरांना याच पाश्चात्य टीव्ही वाहिन्यांवर सेकंदभराचा वेळ मिळतो. अंतराळ पर्यटनाची मोठी बातमी देताना एका तज्ज्ञाला थोडक्यात एवढेच सांगण्याची परवानगी मिळाली की, या अंतराळ पर्यटनामुळे होणारे कार्बन – उत्सर्जन हे त्याच्या संभाव्य वैज्ञानिक आणि आर्थिक फायद्यांपेक्षा अधिक नुकसानकारक आहे. आपल्या हिमालयीन प्रदेशाचा विचार केला तर, पर्यटनामुळे त्रास होतो हे सांगायला किंवा ऐकायला कोणालाच आवडत नाही. हिमाचल प्रदेश या राज्याने अलीकडेच अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या विध्वंसाचा वेध घेतला आहे.

## संपादकीय »

### 'जन' विरुद्ध 'वाद'

***देशाचे पंतप्रधान म्हणून लालकिल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनी केलेल्या भाषणात मोदी यांनी मांडलेले मुद्दे पक्षीय राजकारणाच्या पलीकडचे आहेत, असेच मानायला हवे..***

कितीही उच्च कोटीचा जादूगार असला तरी कधी ना कधी त्याची पोतडी रिकामी होणे नैसर्गिक असते. तसे झाले की नंतर त्यास केलेले खेळ पुन्हा करून दाखवावे लागतात. शिवाय सतत नवनवे खेळ करून दाखवण्याचे आव्हान शरीराची आणि मनाचीही कसोटी पाहणारे असते. नाही म्हटले तरी त्याचा शीण येणे साहजिक. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वातंत्र्य दिनाच्या सलग दहाव्या भाषणात मोठ्या प्रमाणावर पुनरुक्ती झाली असेल, सादरीकरणात ऊर्जेची पातळी काहीशी खालावल्यासारखी वाटली असेल, एरवीचा डौल दिसला नसेल आणि प्रेक्षकांवरील त्यांची पकड सैल झाली असेल तर हे सारे साहजिक म्हणायला हवे. शेवटी सारखे सारखे तरी नवनवीन काय सांगायचे हा प्रश्न आहेच. गेल्याच आठवड्यात लोकसभेत अविश्वास ठरावावरील चर्चेस पंतप्रधानांनी प्रदीर्घ उत्तर दिले.

**जातीय-धार्मिक तणाव कठोरपणेच मोडून काढायचा हा तरुण पोलीस अधिकारी म्हणून मला सुरुवातीचे जे काही धडे मिळाले, त्यापैकीचा एक धडा. हरियाणातील नूह आणि गुरुग्राम येथे दंगली भडकावण्यास कारणीभूत ठरलेल्या मोनू मानेसर आणि त्याच्या साथीदारांबाबत पोलिसांची भूमिका सौम्य का होती? जातीय दंगलींना सामोरं जाण्याची नवीनच पद्धत भाजपने शोधून काढली आहे का?**

# डबल-इंजिन सरकारची कोंडी



जातीय-धार्मिक तणाव कठोरपणेच मोडून काढायचा हा तरुण पोलीस अधिकारी म्हणून मला सुरुवातीचे जे काही धडे मिळाले, त्यापैकीचा एक धडा. दुसरा काही पर्याय उपलब्ध नसेल, गोळीबार करण्याची गरज आहे, असं संबंधित पोलीस अधिकाऱ्याला वाटत असेल त्याला तीदेखील मुभा असते. अर्थात तसं करतानाही बळाचा शक्य तितका कमी वापर करायचा हा नियम नेहमी लक्षात ठेवायचा असतो. त्या जातीय तणावाच्या वेळी जे कुणी मुख्यमंत्रीपदी होते, त्यांना दंगल का भडकली आहे, पोलिसांनी काय कारवाई केली आहे आणि पुढील उत्पात टाळण्यासाठी कोणती पावले उचलावी लागतील याची माहिती दिली जाते. अशा प्रसंगी सगळ्यात महत्त्वाचे ठरते ते सगळ्यात पहिल्यांदा हिंसा भडकावणाऱ्या दोन्ही बाजूंच्या लोकांना ताब्यात घेणे किंवा अटक करणे. तेव्हा प्रत्येक पोलीस अधिकारी जातीय संघर्ष आणि दंगली हाताळण्यात पारंगत होता. मी महाराष्ट्रामध्ये पोलीस अधिकारी म्हणून काम केले त्या काळात जेव्हा जेव्हा अशा दंगली झाल्या आणि मी त्या हाताळल्या तेव्हा तेव्हा तत्कालीन सरकारांनी मी वर वर्णन केलेल्या प्रक्रियेत कधीही आणि कसलाही हस्तक्षेप केला नाही.

उलट, असे कठीण प्रसंग हाताळण्यात अपयशी झालेल्यांना बाजूला केलं जायचं. जातीय दंगल रोखण्याच्या आपल्या कर्तव्याकडे आणि जबाबदारीकडे पोलिसांनी दुर्लक्ष केलं असे मला सगळ्यात पहिल्यांदा वाटलं ते २००२ मध्ये झालेल्या गुजरात दंगलीत. १९८५ मध्ये त्या राज्यात सामान्य स्थिती आणण्यासाठी माझी निवड करण्यात आली होती. त्यामुळे तेव्हापासून मी तेथील अधिकाऱ्यांना ओळखत होतो आणि मी माझं काम कसं केलं होतं, ते त्यांनाही माहीत होतं. त्यामुळे २००२ मधील दंगली हाताळण्यात वरिष्ठ पोलीस अधिकारी अपयशी ठरल्याचं दिसलं तेव्हा तसं का झालं ते तपासण्यासाठी मी स्वतः अहमदाबादला जाण्याचा निर्णय घेतला. दंगली हाताळण्यासंदर्भात पोलीस विभागाची एक पद्धत ठरलेली आहे, हे मी वर सांगितलेलंच आहे. राजकीय हितसंबंधांना त्या कार्यपद्धतींच्या विरोधात जाऊन ती कार्यपद्धतच खिळखिळी करून टाकण्याचं हे पहिलंच ज्ञात उदाहरण होतं. मृतदेहांचं प्रदर्शन मांडायला अटकाव, दंगल घडवणाऱ्या दोन्ही बाजूंनी लोकांना ताब्यात घेणं आणि दंगलखोरांना रोखण्यासाठी आवश्यक त्या सर्व बळाचा वापर करणं यातलं काहीच घडलं नाही!

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अभावग्रस्तांच्या प्रभावाचा संघर्ष संपेना!

## » पाटील, खोत, शेट्टी यांची प्रभावी शेतकरी नेत्यांमध्ये गणना

। सांगली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रघुनाथ दादा पाटील, सदाभाऊ खोत, आणि राजू शेट्टी प्रभावी शेतकरी नेत्यांमध्ये यांची गणना होते. मात्र तरीसुद्धा आजच्या घडीला या तिघांची स्थिती काय आहे. असा जेव्हा विचार मनात येतो, तेव्हा तिघांच्याही वाट्याचा संघर्ष संपलेला नाही हेच लक्षात येते. त्यातल्या त्यात सर्वात ज्येष्ठ म्हणून रघुनाथ दादा म्हणजे साक्षात शरद जोशींनी ज्यांना शेतकरी संघटना आणि ऊस आंदोलनाचे सरसेनापती म्हणून निवडले त्यांचा संघर्ष तर आजही सुरूच आहे.**

भारत राष्ट्र समितीच्या झेंड्याखाली आता त्यांनी नवी लढाई चालवली आहे. राजू शेट्टी यांच्या भाग्यात राज्यातील शेतकरी चळवळीचा निवडून आलेला खासदार होण्याचे यश लाभले. राष्ट्रीय पातळीवर ते चमकले. पण, त्यांच्याही संघटनेला आणि पक्षाला दुहीचा मोठा शाप लागला. जीवाभावाचे नेते सदाभाऊ खोत तुटले तसेच आता रविकांत तुपकर दुसऱ्यांदा सोडून जात आहेत. जाताना त्यांनी शेट्टी यांच्या संघटना आणि पक्षावरच दावा करण्यास सुरुवात केली आहे. राजू शेट्टी विरोधकांची प्रागतिक आघाडी करण्यात गुंतले असताना त्यांना दुसऱ्या बाजूने अगतिक करण्याचाही प्रयत्न होत आहे. भाजपच्या सोबतीने गेलेल्या सदाभाऊ खोत यांना राज्याच्या मंत्रिमंडळात चांगले स्थान मिळाले. भाऊसाहेब फुंडकर यांच्यासारखा नेता कृषिमंत्री पदी लाभला, मात्र त्यांच्या आजारपणामुळे हे खाते सदाभाऊंना राज्यमंत्री असूनही एक हाती हाताळता आले. देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीत उतरून त्यांनी त्या काळात आपली कर्तबगारीही दाखवली. पण आज, सदाभाऊ या सगळ्यापासून दूर आहेत. दूध उत्पादकांसाठी निवेदन, बुलढाणाच्या पूरग्रस्तांना दिलासा देणारा दौरा असे त्यांचे दर्शन होते. पण चळवळीतली माणसं मैदानाबाहेर ढकलली



जात आहेत आणि हट्टाने मैदानात येण्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे हे लपून राहत नाही! पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेची त्रिमूर्ती म्हणजे रघुनाथ दादा, सदाभाऊ आणि राजू शेट्टी. अर्थात त्यांच्यापेक्षा ज्येष्ठ जयपाल अण्णा फराटे आज हयात नाहीत. संजय कोले यांनी नेमस्त पण आश्वासक पध्दतीने संघटनेची वाटचाल चालू ठेवली आहे.पण,नेते म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जात आहे ती ही मंडळी स्वतःच चक्रव्यूहात अडकली आहेत.त्यांची धडपड डोळ्याला दिसते, यांचा प्रभाव मोठा आहे,पण,आपल्याच माणसांकडून चितपट होण्यात त्यांचा वेळ जातो आहे.प्रत्येकाच्या सुवर्णकाळात संघटनेतीलच मंडळी त्यांच्या विरोधात होती.प्रस्थापित फक्त मजा बघत होते.आजही बघत आहेत... कदाचित डावपेच तोच असावा... आभावग्रस्तांचा प्रभाव मोठा आहे. पण,अभाव त्याहून मोठा.... त्यामुळेच त्यांचा संघर्ष संपता संपत नाही..... हा संघर्ष शेट्टींना राष्ट्रीय नेता होऊ देत नाही इतर दोघांना स्थीर होऊ देत नाही

आज रघुनाथ दादा, राजू शेट्टी आणि सदाभाऊ सुद्धा याहून वेगळे जगत नाहीत. थोडे अर्थसक्षम आहेत इतकेच. आपण आपल्या हितासाठी प्रसंगी शरद जोशींची साथ सोडली आणि आपल्या पद्धतीचे राजकारण करताना मूळ विचारांना बगल दिली हे ते सुद्धा मान्य करत असतील. त्याचे फटके त्यांना वेळोवेळी बसलेही आहेत. पण तरीसुद्धा या ऊस पट्ट्यातील शेतकऱ्यांचा आवाज म्हणून जोपर्यंत ते कडाडत नाहीत तोपर्यंत या शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. ही इथली वस्तुस्थिती आहे. त्यांच्या भूमिका चुकत असतील, आपल्या एखाद्या भूमिकेने शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे हे त्यांना माहिती असेल. पण, तरीसुद्धा वास्तवात टिकण्यासाठी त्यांना या तडजोडी मान्य कराव्या लागतात. कारण, अभाव! 2004 साली आमदार होताना शरद जोशींचे भाजपशी सख्य राजू शेट्टी यांना मान्य झाले नाही. त्यांनी शेतकरी संघटनेला रामराम ठोकला आणि काँग्रेसशी जवळीक साधली. ती कोणाच्या लक्षात आली नाही कारण ऊस दराचे तीव्र आंदोलन!

### दुहीचा शाप शरद जोशींनाही !

» शरद जोशी यांना ओळखले जाते ते शेतकऱ्यांचा पंचप्राण म्हणून. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांनी अर्थशास्त्र शिकवले. तुमची लुबाडणूक होत आहे याची जाणीव करून दिली. सरकार नावाची व्यवस्था तुम्हाला मदतीचा हात देतो असे म्हणत असली तरी, प्रत्यक्षात ती तुमच्या हातात भिकेचा कटोरा देत आहे. हे आयुष्यभर ते लोकांना सांगत राहिले. भाषा साधी, सोपी, सरळ वापरून त्यांनी शेतकऱ्यांना जे सांगितले ते सुटा बुटातल्या भारतीय मध्यमवर्गाला आणि उच्चभ्रूवर्गाला कधी समजलेच नाही. जोशी सुद्धा ज्यांच्यासाठी लढत होते आणि सोबतीला ज्यांना घेऊन लढत होते, ते सगळेच अभावग्रस्त होते. शेतकरी संघटनेच्या आंदोलनातून शरद जोशींच्या पदरी पडले काहीच नाही. उलट मोठ्या आर्थिक भुर्दंडाला सातत्याने सामोरे जावे लागले. संयुक्त राष्ट्रातील मोठ्या पदाची जबाबदारी सोडून आलेल्या या नेत्याला लाखोच्या समुदायाने वेड्यासारखे प्रेम दिले. पण ' मान सांगावा जगाला आणि अपमान सांगावा मनाला ' अशा पद्धतीची आर्थिक कुचंबना त्यांच्या वाट्याला आली. मात्र त्यांच्या नेतृत्वावर शंका घेणारे, त्यांना परदेशातून पैसा येतो वगैरे कंड्या कायम पिकवत राहिले. परिणामी जवळचीच मंडळी संशयग्रस्त बनली. त्यांनी जोशींभोवती कोंडाळे केले आणि एकमेका विरोधात कारवाया करत संघटनेला गुंतवून टाकले. आपण या 'प्रिय नरकात' जगतोय याची जाणीव स्वतः जोशीL यांनाही होती. मात्र, ते ती परिस्थिती बदलू शकत नव्हते. जवळच्या नेत्यांना दूर करू शकत नव्हते.

# शहीद शिलाफलकाची अवहेलना!

## » आजी- माजी सैनिक संघटना आक्रमक

। सावळज ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सावळज येथे "मेरी मिट्टी, मेरा देश" अभियानांतर्गत शासनातर्फे राबविण्यात आलेल्या उपक्रमात शहीद जवान शिला फलक लावलेल्या जागेवरून वाद निर्माण झाला आहे. जिन्या खाली अडगळीत शिला फलक लावुन अवहेलना केल्याचा आरोप करीत आजी-माजी सैनिक संघटना, वीरमाता, वीरपत्नी व त्यांच्या कुटुंबीयांनी फलक अनावरण कार्यक्रमावर बहिष्कार टाकत संताप व्यक्त केला आहे.**



सावळज येथे ग्रामपंचायत प्रशासनाकडून शहीद जवानाचा शीला फलक जिन्या खाली लावण्यात आला आहे. ती जागा योग्य नसुन अडगळीची जागा असल्याचा आजी माजी सैनिक संघटनेने केला आहे. तसेच जिन्याखाली अडगळीच्या जागेत धुम्रपान करणाऱ्या लोकांच्याकडुन अस्वच्छता पसरवली जाते. पायऱ्याखाली शिलाफलक लावण्यात आल्याने पायऱ्यावरून रोज शेकडो लोक बँकेच्या कामासाठी चप्पल व बूट घालून ये-जा करीत असतात. त्यामुळे ही शहिदांची अवहेलना ठरते आहे. असे आरोप पत्रकाद्वारे करण्यात आले असून आपण कुटुंबातील थोर व्यक्तींची म्हणजेच आई-वडीलांची समाधी किंवा स्मृतिफलक पायऱ्यांच्या खाली केला असता का? असा संतप्त सवाल करीत ग्रामपंचायत प्रशासन मनमानी कारभार करीत शासनाच्या आदेशाने पालन न करता शिलाफलकाची अवहेलना केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच या अडगळीच्या ठिकाणी शिला फलक लावु नये असे शहीद जवानांच्या कुटुंबियांनी विनंती अर्ज करून ही त्यांची विनंती फेटाळून या ठिकाणीच अनावरण करण्यात आल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. तसेच या शिलाफलक अनावरण कार्यक्रमावर आजी- माजी सैनिक संघटना, वीरमाता, वीरपत्नी व कुटुंबीयांनी बहिष्कार टाकला.

### शासनाच्या नियमानुसार शिलाफलक

» दरम्यान शासनाच्या आदेशानुसारच ग्रामपंचायत परिसरात शिलाफलकाचे अनावरण केले असुन संबंधीत आजी-माजी सैनिक संघटना इतर ठिकाणी ते करु शकतात. अनावरण झालेल्या शिलाफलकाचे संरक्षक कठडा, सावली व सुशोभीकरण करण्यात येणार आहे अशी प्रतिक्रिया सरपंच स्वाती पोळ यांनी दिली.

# कुमठेत पकडली तब्बल 5 फूट लांबीची घोणस!

। तासगाव ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

तालुक्यातील कुमठे येथे शुक्रवारी बाळासाहेब भूपाल लोहार यांच्या द्राक्ष बागेत तब्बल पाच फूट लांबीची घोणस आढळून आली. सर्प मित्र गजानन जाधव यांनी या घोणसला पकडून निसर्गाच्या सानिध्यात सोडून दिले. विषारी साप पाहून घाबरून न जाता सर्पमित्रांना जरूर संपर्क करा असे आवाहन यावेळी सर्प मित्र गजानन जाधव यांनी केले.

घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी की, तासगाव तालुक्यातील कुमठे येथील बागेत तुकाराम लोहार व महादेव लोहार दुपारच्या दरम्यान हे दोघे



भाऊ औषध फवारणी करीत होते. त्यावेळी बागेच्या कडेला गुडघ्याच्या उंचीच्या गवतातून कुकरच्या शिट्टी प्रमाणे आवाज येत होता.जाणकार ग्रामस्थांनी हा आवाज घोणस जातीच्या सर्पाचा असल्याचे खात्रीलायक सांगितले. यानंतर तात्काळ बुधगाव येथील सर्प मित्र गजानन जाधव यांना बोलावण्यात आले.

# पाच राज्यांतील निवडणुकीची रणनीती

## » भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची आज बैठक

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

बुधवारी संध्याकाळी भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची (CEC) बैठक नवी दिल्लीतील पक्षाच्या मुख्यालयात बोलावण्यात आली आहे. या वर्षाच्या अखेरीस पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या तयारीवर या बैठकीत चर्चा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह आणि अमित शहा आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह सर्व 15 CEC सदस्य या बैठकीला उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.




मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, तेलंगणा आणि मिझोराम या पाच राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. त्यासाठी पक्षाने तयारीला वेग दिला आहे. कमकुवत जागांवर पक्ष मजबूत करण्याबाबत बैठकीत चर्चा होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

या बैठकीत उमेदवार आणि प्रचाराची रणनीती ठरवण्याबाबतही चर्चा होण्याची शक्यता आहे. पक्षाने ज्या जागांवर अधिक लक्ष देण्याची गरज आहे, त्यांची यादी तयार केली आहे. केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यासह जमिनीच्या पातळीवर सुरू असलेल्या कामांची माहिती पक्षाचे राज्य नेतृत्व देणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. या बैठकीला मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व्हीडी शर्मा आणि इतर प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या पाच राज्यांपैकी फक्त मध्य प्रदेशात भाजपची सत्ता आहे. सहसा, संबंधित राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर आणि निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतरच भाजप आपले उमेदवार जाहीर करते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये भाजपचा कार्यकर्ता खूप मजबूत आहे, परंतु अशा जागांवर विशेष रणनीती अंतर्गत उमेदवारांच्या पूर्वनिवडीवर बैठकीत चर्चा होऊ शकते. पक्ष इथल्या उमेदवारांबद्दल बोलू शकतो, ज्यामुळे या जागांच्या तयारीला पुरेसा वेळ मिळेल. बुधवारी होणाऱ्या बैठकीत मध्य प्रदेशातील सुमारे 60 ते 70 आणि छत्तीसगडमधील सुमारे 30 ते 40 जागांवर चर्चा होणार असल्याचे समजते. मध्य प्रदेशात भाजपचे सरकार आहे, पण निकाल मागील निवडणुकांप्रमाणे नाही, त्यामुळेच भाजपने नव्या रणनीतीनुसार उमेदवारांवर वेळेआधी विचारमंथन करण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपच्या अंतर्गत सर्वेक्षणानुसार पंतप्रधान मोदी किंवा राज्यातील भाजप संघटनेबद्दल नाराजी नाही, मात्र दीर्घकाळ सरकारमध्ये राहिल्याने उदासीनतेचा परिणाम मतदानाच्या वेळी दिसून येतो.

### राज्य नेतृत्वाचा अभिप्राय घेणार

» केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यासह जमिनीच्या पातळीवर सुरू असलेल्या कामांची माहिती पक्षाचे राज्य नेतृत्व देणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. या बैठकीला मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व्हीडी शर्मा आणि इतर प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या पाच राज्यांपैकी फक्त मध्य प्रदेशात भाजपची सत्ता आहे. सहसा, संबंधित राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर आणि निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतरच भाजप आपले उमेदवार जाहीर करते.

# कोर्टात प्रॉस्टिट्यूट-मिस्ट्रेस शब्दांचा वापर नको !

## » सुप्रीम कोर्टाने महिलांसाठी जाहीर केली शब्दावली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांमध्ये आणि युक्तिवादांमध्ये यापुढे जेंडर स्टिरियोटाइप शब्द वापरले जाणार नाहीत. महिलांसाठी वापरल्या जाणाऱ्या अपमानास्पद शब्दांवर बंदी घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने जेंडर स्टिरियोटाइप कॉम्बॅट हँडबुक लाँच केले आहे. 8 मार्च रोजी महिला दिनानिमित्त सुप्रीम कोर्टात झालेल्या एका कार्यक्रमात कायदेशीर बाबींमध्ये महिलांसाठी आक्षेपार्ह शब्दांचा वापर थांबेल, लवकरच एक शब्दकोशही येईल, असे म्हटले होते.

बुधवारी, 16 ऑगस्ट रोजी हँडबुकचे प्रकाशन करताना, CJI चंद्रचूड म्हणाले की कोणते शब्द रूढीवादी आहेत आणि ते कसे टाळायचे हे न्यायाधीश आणि वकिलांना समजणे सोपे होईल. सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले की, या हँडबुकमध्ये आक्षेपार्ह शब्दांची यादी असून त्या जागी वापरायचे शब्द व वाक्ये देण्यात आली आहेत. न्यायालयात युक्तिवाद करण्यासाठी, आदेश देण्यासाठी आणि त्याच्या प्रति तयार करण्यासाठी त्यांचा वापर केला जाऊ शकतो. हे हँडबुक वकिलांसाठी तसेच न्यायाधीशांसाठी आहे. या हँडबुकमध्ये पूर्वी न्यायालयांनी वापरलेले शब्द आहेत. शब्द का चुकीचे आहेत आणि ते कायद्याचे आणखी विपर्यास कसे करू शकतात हेदेखील स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती चंद्रचूड म्हणाले की, हे पुस्तिका तयार करण्यामागचा उद्देश कोणत्याही निर्णयावर टीका करणे किंवा संशय घेणे हा नसून



पुराणमतवादाची परंपरा किती नकळत सुरू आहे हे सांगणे हा आहे. स्टिरियोटाइपिंग म्हणजे काय आणि त्यातून काय हानी होते हे स्पष्ट करणे हा न्यायालयाचा उद्देश आहे, जेणेकरून न्यायालये महिलांबद्दल आक्षेपार्ह भाषेचा वापर टाळू शकतील. ते लवकरच सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर अपलोड केले जाईल. CJI चंद्रचूड यांनी नमूद केलेली कायदेशीर शब्दावली कोलकाता उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मौसमी भट्टाचार्य यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केली आहे. या समितीमध्ये निवृत्त न्यायमूर्ती प्रभा श्रीदेवन आणि न्यायमूर्ती गीता मित्तल आणि प्राध्यापक झुमा सेन यांचा समावेश होता, जे सध्या वेस्ट बंगाल नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ ज्युरीडिकल सायन्सेस, कोलकाता येथे फॅकल्टी सदस्य आहेत. सरन्यायाधीशांनी मार्चमध्ये सांगितले की, आम्ही अलीकडेच एलजीबीटीक्यू हँडबुक लाँच केले आहे. लवकरच आम्ही लिंग अयोग्य शब्दांचा कायदेशीर शब्दकोशदेखील प्रसिद्ध करणार आहोत. जर तुम्ही 376 मध्ये दिलेला निकाल वाचला तर तुम्हाला समजेल की असे अनेक शब्द आहेत जे अयोग्य आहेत, परंतु ते वापरले जातात. आपली न्यायव्यवस्था कायदेशीर शब्दकोशाने लहान राहणार नाही आणि कालांतराने आपण कायदेशीर भाषेसह पुढे जाऊ, कारण आपण विषय आणि गोष्टींपेक्षा भाषेला अधिक महत्त्व देतो. महिला दिनानिमित्त एका कार्यक्रमात CJI म्हणाले होते- मी असे निर्णय पाहिले आहेत ज्यामध्ये एखादी महिला पुरुषासोबत रिलेशनशिपमध्ये असेल तर तिला मिस्ट्रेस म्हणून लिहिण्यात आले होते. अशी अनेक प्रकरणे आहेत ज्यात घरगुती हिंसाचार कायदा आणि IPC च्या कलम 498A अंतर्गत एफआयआर रद्द करण्यासाठी अर्ज करण्यात आले होते, त्यांच्या निकालांमध्ये महिलांना चोर म्हटले गेले आहे.

### हँडबुक बनवले जनजागृतीसाठी

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांमध्ये आणि युक्तिवादांमध्ये यापुढे जेंडर स्टिरियोटाइप शब्द वापरले जाणार नाहीत. महिलांसाठी वापरल्या जाणाऱ्या अपमानास्पद शब्दांवर बंदी घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने जेंडर स्टिरियोटाइप कॉम्बॅट हँडबुक लाँच केले आहे. न्यायमूर्ती चंद्रचूड म्हणाले की, हे पुस्तिका तयार करण्यामागचा उद्देश कोणत्याही निर्णयावर टीका करणे किंवा संशय घेणे हा नसून पुराणमतवादाची परंपरा किती नकळत सुरू आहे हे सांगणे हा आहे. स्टिरियोटाइपिंग म्हणजे काय आणि त्यातून काय हानी होते हे स्पष्ट करणे हा न्यायालयाचा उद्देश आहे, जेणेकरून न्यायालये महिलांबद्दल आक्षेपार्ह भाषेचा वापर टाळू शकतील.

# 'द घोस्ट ऑफ गांधी' चित्रपटाचा टीझर




शारीब हाश्मी, शर्मन जोशी आणि डेझी शाह स्टारर 'द घोस्ट ऑफ गांधी' या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला आहे. हा टीझर पाहून अंदाज बांधता येतो की निर्माते चित्रपटाच्या माध्यमातून नवीन संकल्पना शोधत आहेत. 3 मिनिटे 14 सेकंदांचा हा टीझर खूपच मजेशीर आहे. सुरुवात होते ती नाराज दिसणाऱ्या डेझी शाहपासून. शरीबने तिला तिच्या त्रासाचे कारण विचारले तेव्हा ती सांगते की देशभरातील लोकांना गांधीजींचे भूत दिसत आहे. यावर शरीबने ही अफवा असल्याचे म्हटले आहे. तर डेझी म्हणते पण ते खरे असेल तर? यानंतर ते दोघेही कोणाच्या तरी जुन्या बंगल्यात गांधीजींशी संबंधित वस्तू शोधताना दिसत आहेत. इतक्यात गांधीजी येतात आणि त्यांच्यासमोर उभे राहतात जे म्हणतात, 'यावेळी आपल्या देशाला पुन्हा माझी गरज आहे. मी येत आहे' या चित्रपटात अभिनेता सुरेंद्र राजन गांधींच्या भूमिकेत दिसत आहेत. त्यांनी यापूर्वी मुन्नाभाई एमबीबीएसमध्ये मकसूद भाई आणि लगे रहो मुन्ना भाईमध्ये ग्रंथपालाची भूमिका साकारली होती. याशिवाय सुरेंद्र यांनी अजय देवगणच्या 'द लिजेंड ऑफ भगत सिंग'मध्येही महात्मा गांधींची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन मनीष किशोर यांनी केले आहे. याद्वारे आरजे मेहवेश बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे.

# सिमरत कौरची महत्वाची भूमिका!



तब्बल 22 वर्षांपूर्वी आलेल्या गदर इतकंच प्रेक्षकांच प्रेम या चित्रपटाला मिळत आहे. गदर 2 ने रिलीजच्या अवघ्या 5 दिवसात बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली आहे. त्यात कालचा स्वातंत्र्यदिन या चित्रपटासाठी खुपच खास ठरला. यादिवशी गदर 2 ने 200 कोटींच्या क्लबमध्ये एंट्री केली आहे. गदर 2 ने रिलीजच्या पाचव्या दिवशी म्हणजेच स्वातंत्र्यदिनी रेकॉर्डब्रेक कमाई करत पुन्हा एकदा रेकॉर्ड केला आहे. भारत पाकिस्तानातील प्रेमकहानीवर आधारित हा सिनेमा पाहण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी झाली होती. गदर 2 ने रिलीजच्या पाचव्या दिवशी सगळ्या जास्त कोटींचा गल्ला जमावला आहे. या आकडेवारी नुसार सनी देओल आणि अमिषा पटेल स्टार गदर 2 ने प्रभासच्या बाहुबली 2, सलमान खानचा सुलतान आणि हृतिक रोशनच्या वॉरला देखील मागे टाकले आहे. बॉलीवूडमधील टॉप 5 सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत गदर 2 आता दुसऱ्या क्रमांकावर आहे. चित्रपटाची कमाई आणि चाहत्यांचे प्रेम पाहून सनी देओल आणि निर्माते खूश आहेत. या चित्रपटात सनी देओल आणि अमिषा पटेलसोबत उत्कर्ष शर्मा महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. उत्कर्षने गदर २ मध्ये सनी देओलच्या मुलाची भूमिका साकारली आहे. सिमरत कौरने देखील चित्रपटात महत्वाची भूमिका साकारली आहे.

# शाहरुखने मन्नतमध्ये तिरंगा फडकवला



मंगळवारी ७७ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींनी तिरंगा फडकावला आणि राष्ट्रगीत गायले. यामध्ये शाहरुख खान, शिल्पा शेट्टी, सारा अली खान, पूजा हेगडे आणि विकी कौशल-कतरिना कैफ यांच्या नावांचा समावेश आहे. शाहरुख खानने त्याच्या मुंबईतील मन्नत या बंगल्यावर तिरंगा फडकवला. याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. किंग खानसोबत त्याचा धाकटा मुलगा अबराम आणि पत्नी गौरी खान देखील व्हिडिओमध्ये दिसत आहेत. यावेळी सर्वजण पांढऱ्या पोशाखात दिसत आहेत. शिल्पा शेट्टीने आपल्या घरी तिरंगा फडकवून स्वातंत्र्याचा आनंद साजरा केला. याचा एक व्हिडिओ अभिनेत्रीने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला आहे, ज्यामध्ये ती तिची आई आणि मुलगा विआनसोबत दिसत आहे. ध्वजारोहण समारंभानंतर संपूर्ण कुटुंबाने जन गण मन गायले आणि 'भारत माता की जय'चा नारा दिला. व्हिडिओ पोस्ट करताना शिल्पाने कॅप्शनमध्ये लिहिले, 'वंदे मातरम.' पूजा हेगडेने तिचा एक व्हिडिओ इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केला आहे, ज्यामध्ये ती हातात तिरंगा फडकवत आहे. व्हिडिओ शेअर करताना पूजाने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'वंदे मातरम. भारत, माझे प्रेम'. कतरिना कैफने पती विकी कौशलसोबत स्वातंत्र्य दिन साजरा करतानाचा एक फोटो शेअर केला.

# हर्षालीने केला देश रंगीला गाण्यावर डान्स

आज देशभरात ७७ वा स्वातंत्र्यदिन साजरा होत आहे. दरम्यान, सलमान खानचा चित्रपट बजरंगी भाईजान फेम अभिनेत्री हर्षाली मल्होत्रा हिनेही स्वातंत्र्य दिन वेगळ्या पद्धतीने साजरा केला आहे. हर्षालीने तिचा एक डान्स व्हिडिओ चाहत्यांसोबत शेअर केला आहे, ज्यामध्ये ती देशभक्तीच्या रंगात रंगलेली दिसत आहे. व्हिडिओमध्ये हर्षालीने 'देश रंगीला' गाण्यावर जबरदस्त डान्स केला आहे. यादरम्यान तिने तिरंगा थीमचे कपडे घातले आहेत, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत आहे. व्हिडिओ शेअर करताना हर्षालीने चाहत्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छाही दिल्या आहेत.

# अभिषेकने मनिषाला मारली मिठी

बिग बॉस ओटीटी-2 ची फायनलिस्ट मनिषा राणीने शोचा रनर अप अभिषेक मल्हानची हॉस्पिटलमध्ये भेट घेतली. अंतिम फेरीत सहभागी झाल्यानंतर अभिषेकला थेट रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याला डेंग्यू झाल्याचे समोर आले आहे. यामुळे त्याला अंतिम फेरीतही पूर्णवेळ सहभागी होता आले नव्हते. मनिषा तिच्या वडिलांबरोबर अभिषेकच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी रुग्णालयात गेली. या भेटीचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मनिषाने व्हिडिओ शेअर करत लिहिले की, शो कोणीही जिंकला असला तरी खरा विजेता अभिषेक मल्हान आहे. तिने लिहिले की, अभिषेक ट्रॉफी जिंकू शकला नाही पण त्याने संपूर्ण भारताची मने नक्कीच जिंकली आहेत. मनिषाने तिच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये मनिषा राणी हॉस्पिटलमधील एका खोलीत



येते, तिथे अभिषेक ॲडमिट दाखल आहे. खोलीत प्रवेश करताच तिने त्याला मिठी मारली. अभिषेकने मनिषाच्या वडिलांच्या पायाला स्पर्श केला. बिग बॉसच्या घरात या दोघांची मैत्री चांगलीच रंगली होती. सुरुवातीपासून शेवटपर्यंत दोघे मित्र राहिले. मनिषाला जेव्हा अभिषेक आणि एल्विश यांच्यात निवड करण्यास सांगण्यात आले, तेव्हा तिने अभिषेकचे नाव घेतले. मनिषाने अभिषेकसाठी व्हिडिओ शेअर केला आणि लिहिले – बिग बॉस ओटीटी सीझन-2 चा हिरो.., तू ट्रॉफी जिंकली नसशील, पण तू संपूर्ण भारताचे मन जिंकले आहेस. तू माझ्यासाठी नेहमीच विजेता आहेस. बिग बॉसने मला खूप काही दिले. त्यात तुझ्यासारखा खास मित्रही दिला आहे.

# भारतीय संघ आयर्लंडला रवाना

## » आयर्लंडविरुद्ध तीन सामन्यांची टी-20 मालिका

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**तीन सामन्यांच्या टी-20 मालिकेसाठी टीम इंडिया मंगळवारी आयर्लंडला रवाना झाली. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (BCCI) आणि कर्णधार जसप्रीत बुमराहने फ्लाइटमधील अनेक फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. फोटोंमध्ये बुमराह, प्रसिद्ध कृष्णा, उपकर्णधार ऋतुराज गायकवाड, वॉशिंग्टन सुंदर आणि रिंकू सिंग यांचा समावेश आहे. मालिकेतील पहिला सामना 18 ऑगस्ट रोजी मालाहाइड येथे खेळवला जाईल.**

जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघ स्वातंत्र्य दिनाच्या दिवशीच (ऑगस्ट १५) मंगळवारी सकाळी आयर्लंडला रवाना झाला. टीम इंडिया आयर्लंडविरुद्ध तीन टी२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. अनेक खेळाडूंसाठी ही एक महत्त्वाची मालिका असेल पण सर्वांच्या नजरा जसप्रीत बुमराहवर असतील. तब्बल दीड वर्षानंतर जसप्रीत बुमराह राष्ट्रीय संघात पुनरागमन करत आहे. पाठीच्या दुखापतीमुळे संघापासून दूर होता. भारतीय क्रिकेट बोर्डाने मंगळवारी सकाळी संघ आयर्लंडला रवाना झाल्याची छायाचित्रे सोशल मीडियावर पोस्ट केली. भारतीय क्रिकेटपटूंचे हसरे चेहरे हे दाखवतात की खेळाडू चांगल्या स्थितीत आहेत वेस्ट इंडिजविरुद्धची टी२० मालिका गमावल्यानंतर आता टीम इंडियाचा सामना आयर्लंडशी दोन हात करणार आहे. भारत आणि आयर्लंड यांच्यात १८ ऑगस्टपासून तीन सामन्यांची टी२० मालिका खेळवली जाणार आहे. मात्र, या मालिकेत टीम इंडियाची कमान जसप्रीत बुमराहच्या हाती आहे. आयर्लंडविरुद्धच्या टी२० मालिकेत जवळपास सर्व वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. जसप्रीत बुमराह या संघाचा कर्णधार आहे. त्याचबरोबर यशस्वी जैस्वाल, तिलक वर्मा, रिंकू सिंग, शाहबाद अहमद, शिवम दुबे आणि जितेश शर्मा या युवा खेळाडूंचा संघात समावेश करण्यात आला आहे. आयर्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी२० मालिकेसाठी, भारतीय संघाचे नेतृत्व जसप्रीत बुमराहकडे असेल, जो पाठीच्या दुखापतीतून पूर्णपणे बरा तंदुरस्त झाला आहे. प्रदीर्घ कालावधीनंतर तो मैदानात परतणार आहे, याशिवाय या टी२० मालिकेसाठी रिंकू सिंग आणि जितेश शर्मा यांचाही टीम इंडियामध्ये समावेश करण्यात आला आहे.



बीसीसीआयने खुद्द याबाबतचे ट्वीट शेअर केले आहे आणि पोस्टच्या खाली "हम आ गये." हे शीर्षक दिले आहे.

जसप्रीत बुमराह (कर्णधार), ऋतुराज गायकवाड (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, तिलक वर्मा, रिंकू सिंग, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), जितेश शर्मा (विकेटकीपर), शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, शाहबाबा अहमद, रवी बिश्नोई, प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंग, मुकेश कुमार आणि आवेश खान.

पॉल स्टर्लिंग (कर्णधार), अँड्र्यू बालबर्नी, मार्क एडेअर, रॉस अडायर, कर्टिस कॅम्फर, गॅरेथ डेलेनी, जॉर्ज डॉकरेल, फिओन हँड, जोशुआ लिटल, बॅरी मॅककार्थी, हॅरी टेक्टर, लॉर्कन टकर, थिओ व्हॅन व्होइरकॉम , बेन व्हाईट आणि क्रेग यंग. भारत आणि आयर्लंड यांच्यातील टी२० मालिकेचे प्रसारण हक्क मिळाले आहेत. अशा परिस्थितीत, स्पोर्ट्स १८वर टीम इंडिया आणि आयर्लंड टी२० मालिकेचा आनंद पहिल्यांदाच घेता येईल.

### रिंकू सिंग जितेश शर्मा यांचा समावेश

» आयर्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी२० मालिकेसाठी, भारतीय संघाचे नेतृत्व जसप्रीत बुमराहकडे असेल, जो पाठीच्या दुखापतीतून पूर्णपणे बरा तंदुरस्त झाला आहे. प्रदीर्घ कालावधीनंतर तो मैदानात परतणार आहे, याशिवाय या टी२० मालिकेसाठी रिंकू सिंग आणि जितेश शर्मा यांचाही टीम इंडियामध्ये समावेश करण्यात आला आहे. बीसीसीआयने खुद्द याबाबतचे ट्वीट शेअर केले आहे आणि पोस्टच्या खाली "हम आ गये." हे शीर्षक दिले आहे.

### बुमराह दुखापतीतून पूर्णपणे तंदुरस्त

» आयर्लंडविरुद्धच्या टी२० मालिकेत जवळपास सर्व वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. जसप्रीत बुमराह या संघाचा कर्णधार आहे. त्याचबरोबर यशस्वी जैस्वाल, तिलक वर्मा, रिंकू सिंग, शाहबाद अहमद, शिवम दुबे आणि जितेश शर्मा या युवा खेळाडूंचा संघात समावेश करण्यात आला आहे. आयर्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी२० मालिकेसाठी, भारतीय संघाचे नेतृत्व जसप्रीत बुमराहकडे असेल, जो पाठीच्या दुखापतीतून पूर्णपणे बरा तंदुरस्त झाला आहे.

### टी20 मालिकेचे वेळापत्रक

» पहिली टी२० (डब्लिन), भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:३० वाजता

» २० ऑगस्ट – दुसरी टी२० (डब्लिन), भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:३० वाजता

» २३ ऑगस्ट – तिसरी टी२० (डब्लिन), भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:३० वाजता

---

# फुटबॉल स्पर्धात स्पेनची अंतिम फेरीत धडक

## » स्वीडनविरुद्ध झालेल्या उपांत्य सामन्यात 2-1 असा विजय

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**ओल्गा कार्मोनाने (८९व्या मिनिटाला) केलेल्या निर्णायक गोलच्या जोरावर स्पेनने मंगळवारी स्वीडनविरुद्ध झालेल्या उपांत्य सामन्यात २-१ असा विजय मिळवत महिला विश्वचषक फुटबॉल स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात स्पेनपुढे यजमान ऑस्ट्रेलिया व इंग्लंड यांच्यात बुधवारी होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य सामन्यातील विजेत्या संघाचे आव्हान असेल.**

'फिफा' क्रमवारीत सातव्या स्थानी असणाऱ्या स्पेनकडे आता पहिले जागतिक विजेतेपद पटकावण्याची संधी आहे. स्पेनविरुद्धच्या पराभवामुळे क्रमवारीत दुसऱ्या स्थानी असणाऱ्या स्वीडन संघाचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. त्यामुळे स्पर्धेतील आव्हान शाबूत असलेला स्पेन हा क्रमवारीत सर्वात अव्वल संघ आहे. स्वीडनचा विश्वचषक स्पर्धेतील पाचवा उपांत्य सामना होता आणि पाचही वेळा त्यांना पराभव पत्करावा लागला आहे. स्पेन आणि स्वीडन या संघांना ८० मिनिटांपर्यंत एकही गोल करता आला नाही. परंतु, सामन्याच्या



अखेरच्या १० मिनिटांत तीन गोल करण्यात आले.सामन्याच्या सुरुवातीपासून स्पेनने चेंडूवर अधिक वेळ ताबा ठेवला. स्पेनने गोल करण्याच्या अनेक संधीही निर्माण केल्या. मात्र, स्वीडनच्या बचाव फळीने त्यांचे सर्व प्रयत्न हाणून पाडले. दुसरीकडे, स्पेनच्या बचाव फळीनेही स्वीडनच्या आघाडीपटूंना रोखले होते. मध्यंतराच्या गोलशून्य बरोबरीनंतर दुसऱ्या सत्रात स्वीडनने आक्रमक सुरुवात केली.

### स्पेनसाठी निर्णायक गोल

» नेदरलँड्सविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यात अतिरिक्त वेळेत निर्णायक गोल करणाऱ्या १९ वर्षीय सलमाने स्वीडनविरुद्ध ८१व्या मिनिटाला गोल नोंदवत स्पेनला आघाडी मिळवून दिली. मात्र, हा गोल पंचांनी तपासून पाहिला. त्यामुळे काही काळ सामन्यात तणावाचे वातावरण होते. अखेर स्पेनला गोल बहाल करण्यात आला. मात्र, स्पेनला ही आघाडी फार काळ टिकवता आली नाही. स्वीडनच्या रेबेका ब्लोमक्विस्टने (८८व्या मि.) गोल झळकावत सामना १-१ असा बरोबरीत आणला. त्यामुळे सामन्यात आणखी चुरस निर्माण झाली. स्वीडनने केलेल्या गोलच्या पुढच्याच मिनिटाला कार्मोनाने त्यांची गोलरक्षक जेसीरा मुसोविचला चकवत गोल केला आणि स्पेनला २-१ असे आघाडीवर नेले. स्पेनसाठी हाच गोल निर्णायक ठरला.